**— प्रेस नोट—**

**साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथील अंमली पदार्थ विरोधी पथकाने मु.वरखड ता—नांदोद/राजपिपला जिल्हा नर्मदा,राज्य गुजरात येथील घरात सुरू असलेला एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थ निर्मितीचा कारखाना शोधुन काढुन अंमली पदार्थ बनविण्याचा कारखाना उद्‌वस्थ केलेबाबत.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे | :— | साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई |
| २. | गुन्हा रजि. क्र. व कलम | :— | ५३४/२०२५ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क) r/w २२ (क), ९ (अ) r/w २५ (अ), २९ |
| ३. | गुन्हा घडला दि. व वेळ | :— | दिनांक —२१/०५/२०२६ रोजी २०.४५ वाजता |
| ४. | गुन्हा दाखल दि. व वेळ | :— | दिनांक —२२/०५/२०२६ रोजी ००.३७ वाजता |
| ५. | अटक आरोपीतांची संख्या | :— | **२** |
| ६. | तपास पथक | :— | पोनि. दिपक गिरमे<br>सपोनि. दयानंद काशिनाथ वणवे<br>पोउनि. पंकज रामधन परदेशी (तपासी अधिकारी)<br>पो.हवा/९७०३८८ शशीकांत हरी पाटील<br>पो.हवा/०३११४६ चंद्रकांत शामराव पवार<br>पो.हवा/०१२७६ नितीन उत्तम खैरमोडे<br>पो.शि./१३००८१ अनिल पांडुरंग करांडे ( फिर्यादी ) |
| ७. | मार्गदर्शन | :— | १. मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती सो<br>२. मा. पोलीस सह आयुक्त ( का. व सु. ) श्री. मनोज कुमार शर्मा<br>३. मा. अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) श्री. अभिनव देशमुख<br>४. मा. पोलीस उपायुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) परिमंडळ—३ श्री. दत्ता नलावडे<br>५. मा. सहा. पोलीस आयुक्त (साकीनाका विभाग) प्रदिप मैराळे<br>६. मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, सुनिल यादव साकीनाका पो. स्टे. (तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरिक्षक, साकीनाका पो. स्टे)<br>७. मा. प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सपना क्षीरसागर, साकीनाका पो. स्टे. |

**गुन्हयाची हकीकत—**

दिनांक २१/०५/२०२५ रोजी पेनीनसुला हॉटेलच्या समोर, अंधेरी —घाटकोपर लिंकरोडवर, साकीनाका येथे १०१ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) हा अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेली महिला नामे मुस्कान समीर खान, वय—२६ वर्ष, धंदा—ओला उबर चालक, रा. ठी— कैलास पार्क हॉटेलच्या बाजुला, कैलास पुरम, पाईपलाईन रोड, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका मुंबई हिस ताब्यात घेवुन तिच्या विरूद्ध साकीनाका पोलीस ठाणे येथे वरीप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्यात अटक आरोपी हिच्याकडे कौशल्यपुर्ण केलेल्या तपासात तिने सदरचा मेफेड्रोन (एमडी) हा अंमली पदार्थ इसम नामे वझुल कमर अबुल वफा चौधरी उर्फ पप्पु वय—५६ वर्षे, धंदा—व्यवसाय, रा.ठी—रूम नं—०३, माहेर चाळ, जुना मुंबई पुणे रोड, रेहमानिया हॉस्पिटलच्या जवळ, कौसा, मुंब्रा, ठाणे याचेकडुन खरेदी केल्याचे सांगितले.

दिनांक २६/०५/२०२६ रोजी साकीनाका पोलीस ठाण्याचे अंमली पदार्थ विरोधी पथकाने सदर आरोपीस शिळफाटा येथुन ताब्यात घेतले.

त्याचेकडे केलेल्या कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपासात त्याने सदरचा मेफेड्रोन (एमडी) हा अंमली पदार्थ मु. वरखड ता–नांदोद/राजपिपला, जिल्हा नर्मदा, राज्य गुजरात येथिल एका ओळखीच्या इसमाचे घर भाड्याने घेवुन त्याचे घरात स्वत: बनवित असल्याचे सांगितले. त्यावरून साकीनाका पोलीस ठाण्याचे अंमली पदार्थ विरोधी पथकाने वर नमुद पत्त्यावर गुजरात राज्य छापा टाकण्यात आला.

**छापा कारवाईत कारवाईत खालीलप्रमाणे मुद्‌देमाल जप्त करण्यात आला.**

१. द्रवरूपी मॅफेड्रॉन ( Liquid MD)– २०.०४० किलो.– ७४.४६ कोटी रूपये (आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार )
२. 2-Bromo-4-methylaniline केमिकल २६ किलो – ७,८०,०००/–रूपये,
३. 4Methylpropiophenone केमिकल ५० लिटर– २,५०,०००/–रूपये
४. Monomethylamine केमिकल २० लिटर– २०,०००/ –रूपये
५. Bromin केमिकल १३.५० लिटर– ५,४०,०००/–रूपये
६. Chloroform केमिकल ३५ लिटर– १,४०,०००/–रूपये
७. तीन स्टेरर मशीन– ७५,०००/– रूपये
८. TATA Voltas- कंपनीचे २ कमर्शिअल फ्रिज – १,००,०००/ रूपये
९. ५ गोलाकार FLASK-५०,०००/– रूपये
१०. हिटींग मेटल १ नग– ५०,०००/–

————————————————————

जप्तीची एकुण किंमत– **७४. ७६ कोटी रूपये.**

अशाप्रकारे आजपावेतो नमुद गुन्ह्याचे तपासामध्ये एकुण २०.१४१ किलो वजनाचा एमडी हा अंमली पदार्थ, एमडी बनविण्यासाठी आवश्यक रसायने, एमडी बनविण्यासाठी साहित्य व आरोपीतांचे मोबाईल असा मिळुन एकुण ७४.९७ कोटी रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.